


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, शनिवार, दि.१४ जून २०२५

वर्ष : ०४, अंक : ३०३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

## लोकल AC करण्याचा सरकारचा मास्टर प्लॅन, पण प्रवाशांचा गोंधळ !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** 'एसी ट्रेन द्यायच्या आणि त्याही भाडे न वाढवता, असा मास्टर प्लॅन सरकारकडे आहे', असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच केले. राज्य सरकारच्या मास्टर प्लॅनबाबत अद्याप कोणालाच माहिती नाही. मुंबई लोकलच्या ताफ्यातील सर्व लोकल वातानुकूलित करण्यासाठी आर्थिक तरतूद कोण आणि किती वर्षांत करणार, रेल्वेसाठी एसी लोकल बांधणी करणाऱ्या रेल्वे कारखान्याच्या उत्पादन क्षमतेबाबत, मुंबई लोकल ताफ्यात लोकल दाखल करण्याबाबतची अंमलबजावणी तसेच अर्थसंकल्पावर काय परिणाम होणार याबाबत कोणतेही नियोजन अद्याप समोर आले नाही.



**मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या ताफ्यात एकूण २६० लोकल, अवघ्या १४ एसी लोकल**

मुंबई उपनगरी रेल्वेच्या ताफ्यात एकूण २६० लोकल गाड्या आहेत. यात मध्य रेल्वेकडून १६४ लोकल गाड्या आणि पश्चिम रेल्वेकडून ९६ लोकल गाड्या चालवण्यात येतात. दोन्ही रेल्वेंत मिळून अवघ्या १४ वातानुकूलित लोकल आहेत. मुंबईत धावणाऱ्या एका एसी लोकलच्या बांधणीचा खर्च अंदाजे ८० ते ९० कोटी आहे. मुंबई लोकलचा संपूर्ण ताफा एसी करण्यासाठी २४०-२५० एसी लोकल गाड्यांची आवश्यकता आहे. यासाठी २१ हजार कोटींहून अधिक आर्थिक निधीची आवश्यकता आहे. यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील निविदा मागवण्याचा पर्याय उपलब्ध आहे. मात्र, हा निधी राज्य सरकार, केंद्र सरकार की अन्य पर्यायांच्या माध्यमाने उभा करणार यात अद्याप कोणतीही स्पष्टता नाही.

**लोकल बांधणीसाठी निविदा प्रक्रिया सुरू झालेली नाही**

मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या एमयूटीपी अंतर्गत पूर्ण होणाऱ्या रेल्वे प्रकल्पासाठी राज्य आणि केंद्र सरकार ५०:५० टक्के असा अर्थभार उचलतात. एमआरव्हीसीच्या एमयूटीपी ३ अ मध्ये २३८ एसी लोकल खरेदीची तरतूद सर्वप्रथम करण्यात आली. हा प्रकल्प सन २०१८ मध्ये मंजूर करण्यात आला. सद्यः स्थितीत या लोकल बांधणीसाठी अद्याप निविदा प्रक्रिया सुरू झालेली नाही.

**२४० लोकलची पूर्तता होण्यासाठी ५ वर्ष अपेक्षित...**

मुंबई एसी लोकलची बांधणी चेन्नईस्थित इंटिग्रल कोच फॅक्टरीमध्ये (आयसीएफ) करण्यात येते. शहरातील प्रवासी गर्दी लक्षात घेता त्यानुसार एसी लोकलची बांधणी करून त्याची मुंबईच्या रुळांवर चाचणी करण्याच्या प्रक्रियेला किमान एक वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे. चाचणी यशस्वी झाल्यानंतर पुढील वर्षात किमान ४० ते ५० लोकलची बांधणी अपेक्षित आहे. २४० लोकल गाड्यांची पूर्तता होण्यासाठी प्रत्यक्षात लोकल बांधणीच्या वर्षापासून पुढील पाच वर्षांचा कालावधी अपेक्षित आहे, असे संबंधित अधिकारी सांगतात.

## थोडक्यात

### आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून चंद्रपूर जिल्हा होणार 'हनी हब'

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्याला मध उत्पादनाच्या माध्यमातून 'हनी हब' बनविण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल उचलण्यात आले आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून मधमक्षिका पालनासाठी मामला व पिरली या गावांची ३ जानेवारी २०२४ रोजी 'मधाचे गाव' म्हणून घोषणा करण्यात आली होती. या घोषणेनंतर सुरु झालेल्या उपक्रमातून आता प्रत्यक्ष प्रशिक्षण व प्रात्यक्षिक टप्पा राबविण्यात येत आहे. आ. मुनगंटीवार यांचे प्रयत्न या क्षेत्रासाठी गेम चेंजर ठरणार आहेत.

जिल्ह्यातील ४० प्रशिक्षणार्थींनी नुकतीच देशातील पहिले 'मधाचे गाव' म्हणून प्रसिद्ध असलेल्या मांघर ता. महाबळेश्वर, जि. सातारा येथे भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी स्थानिक व्यवस्थापन व ग्रामस्थांकडून वर्षभरात ७ ते ८ हजार किलोपर्यंत होणाऱ्या मध उत्पादनाच्या यशस्वी कार्यपध्दतीची सविस्तर माहिती घेतली. मधसंचय, प्रक्रियेची शिस्तबद्ध पद्धत, बाजारपेठेचा अभ्यास आणि ग्राम संघटनात्मक एकात्मतेची उदाहरणे यांचा थेट अनुभव घेत प्रशिक्षणार्थींनी आपल्या ज्ञानात भर घातली.

यावेळी प्रशिक्षणार्थ्यांना पुणे आणि मधसंचनालय महाबळेश्वर येथे विशेष प्रशिक्षणही देण्यात आले. यामध्ये मधमक्षिकापालन, पेटी व्यवस्थापन, कीटकनाशकांचा प्रभाव, वनीकरणाशी समन्वय इत्यादी बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

## जिल्हाधिकारी यांनी विठ्ठल रूक्मिणी मंदिर परीसर वाहन प्रतिबंध क्षेत्र म्हणून केले घोषीत

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१३, पंढरपूर :** आषाढी शुद्ध एकादशीला पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. आषाढी यात्रा सोहळयासाठी अंदाजे ८ ते १० लाख भाविक पंढरपूरला येतात. यात्रेच्या कालावधीमध्ये भाविक मोठ्या प्रमाणात्त पंढरपूरला येत असतात. पंढरपूर शहरात येणा-या भाविकांची संख्या पाहता, श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदीर परीसर, पुढे महाद्वार चौक परीसर या भागात भाविकांची संख्या मोठया प्रमाणात असते. या भाविकांना पार्किंग केलेल्या वाहनांची अडचण येते. तसेच वाहतूक कोंडी होऊन अपघात होणेचाही धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मंदिर परिसर वाहन प्रतिबंध क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे.



पंढरपूरात आलेले भाविक दर्शनरांगेकडे व मंदिराकडे पायी चालत जात असतात. अशावेळी बर्याच ठिकाणी प्रदक्षिणा मार्गावर तसेच जागोजागी दुचाकी, चारचाकी वाहने पार्किंग केलेले असतात. तसेच दर्शनासाठी किंवा अन्य कामासाठी वाहनांची अनावश्यक वर्दळ असते. तसेच पायी जाणारे भाविकांमधून वाहनांची ये-जा होत असते. त्यामुळे रस्ता अरूंद होवून भाविकांना रस्त्यावरून ये-जा करण्यास अडचण निर्माण होते. या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊन अपघात होण्याचाही धोका निर्माण होऊ शकतो. हे टाळण्यासाठी जिल्हाधिकारी सोलापूर तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी वाहन प्रतिबंधक आदेश पारीत केले आहेत.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ (ब) नुसार पंढरपूर शहरातील श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदीर परीसर ते पुढे महाद्वार चौक परीसर हा परीसर वाहन प्रतिबंध क्षेत्र म्हणून घोषीत करीत आहे. सदरचा आदेश दिनांक १३ जून ते २५ जून या कालावधीत सकाळी ५ वाजेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत व दि. २६ ते १० जुलै कालावधीत २४ तास या वेळेकरीता लागू राहणार आहे.

**या वाहनास देण्यात आली सूट...**

शासकीय सेवा, अत्यावश्यक सेवा, मंदीर परीसरात राहणारे, मंदीरात कामकाज करणारे व्यक्तींचे वाहनांसाठी पोलीस प्रशासनाकडून पास प्राप्त झालेनंतर सदरच्या आदेशातून सूट राहील.

वाहनाची पार्कींग व्यवस्था पंढरपूर नगर परीषदेमार्फत करण्यात यावी. नगर परीषदेने बॅरीकेड्स लावावेत. मंदीर परिसरात राहणारे, काम काज करणारे व्यक्तींकरीता नमुद कालावधीसाठी पास देणेची व्यवस्था पोलीस प्रशासनाने करावी. मंदीर परिसरातील व्यावसायिकांनी मालाची ने-आण करणेकामी पोलीस प्रशासनाशी चर्चा करुन ठराविक वेळ निश्चीत करुन वाहतूक करण्याची खबरदारी घ्यावी.

या आदेशानुसार - श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिम द्वार, मंदीर परीसर पुढे महाद्वारचौक परीसर दुचाकी चारचाकी व इतर सर्व वाहने चालवण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच वाहने पार्कींग करता येणार नाहीत. तसेच मंदीर परीसरातील छोटया छोटया अरूंद रस्त्यावर वाहने लावता येणार नाहीत.

## शेती गट बदलाचे अनेक प्रस्ताव रखडल्यामुळे शेतकरी संतापले...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, बुलडाणा :** शेतीचे गट बदलल्यामुळे वारंवार होणारे वाद लक्षात घेता शासनाने 'सलोखा' योजना राबविली. यातून सामंजस्याने गट बदलाची अनेक प्रकरणे मार्गी लागली. मात्र, शासन निर्णयामधील शेतीचा ताबा (वहिती) बारा वर्षे असावा ही अट सध्या योजनेच्या अंमलबजावणीस अडथळा ठरू लागली आहेत. गट बदल केलेली शेती खरेदी करून काहीच वर्षे झाली आहेत, अशा शेतकऱ्यांना केवळ बारा वर्षांच्या सक्तीच्या अटीमुळे गट बदल करणे अशक्यप्राय झाले आहे. ही अटच रद्द करावी, अशी मागणी गट बदल झालेल्या शेतकऱ्यांकडून जोर धरू लागली आहे.

एक इंच जरी शेती इकडे-तिकडे झाल्यास प्रकरण हाणामारीपर्यंत पोहोचते. जन्मभराची कटूता एकमेकांप्रती निर्माण होते. जमिनीच्या वादाची कोट्यवधीहून अधिक प्रकरणे विविध न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचे शासनाने मान्य केले आहे. मुख्यत: मालकी हक्काचे वाद, शेतबांधाचे वाद, जमिनीच्या ताब्याचे वाद, रस्ता, शेतजमीन मोजणी, अधिकार अभिलेख्यातील चुकीच्या नोंदीमुळे होणारे वाद, शेतीवरील अतिक्रमण, शेती वहिवाट, भावाभावांतील वाटणीच्या वादाचे खटले न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. शासकीय योजनेमधील त्रुटी किंवा प्रस्ताव अमान्यतेबाबतचे वादही अनेक आहेत. हा प्रश्न सोडविणाऱ्या सलोखा योजनेला राज्य शासनाने मुदतवाढ दिली असली तरी संबंधित शेतकऱ्यांनी ताब्यात असलेली शेती बारा वर्षे वहिती केलेली असावी, अशी अट घातल्याने अनेक प्रकरणांचे प्रस्ताव तहसीलस्तरावर रखडले आहेत. या अटीबाबत जनजागृती न झाल्याने नव्याने किंवा वर्ष, दोन वर्षे, पाच, दहा वर्षांपूर्वी शेती खरेदी केलेल्या शेतकऱ्यांना गट बदलाच्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे.

अट माहिती नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी कागदपत्रांची जुळवाजुळव केली. प्रस्ताव तलाठ्यांमार्फत मंडळ अधिकाऱ्यांकडे सादर केले. मंडळ अधिकाऱ्यांनी पडताळणी करून तहसीलदारांकडे सादर केले. मात्र, त्यातील काही प्रस्तावांवर बारा वर्षांची अट पूर्ण नाही, असा शेरा मारल्याने प्रकरणे अडकली आहेत. त्यामुळे कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी शेतकऱ्यांना करावी लागलेली कसरत व्यर्थ ठरत आहे. बारा वर्षे ताबा असलेली प्रकरणे निकाली काढली जातात. तहसीलदारांनी प्रकरण मंजूर केल्यानंतर गटाचा ताबा घेण्यासाठी संबंधित तालुक्याच्या ठिकाणच्या दुय्यम निबंधक कार्यालयाकडे पाठविले जाते.

एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे देण्यासाठी सलोखा योजना अंमलात आणली आहे. या माध्यमातून राज्यातील अनेक शेतकऱ्यांना गट बदलवून देण्यात आले. ही योजना १ जानेवारीला संपुष्टात आली होती. त्याला आणखी दोन वर्षांची मुदतवाढ देण्यात आली असून, आता १ जानेवारी २०२७पर्यंत शेतकऱ्यांना आपले बदल झालेले गट बदलवून शेतीचा ताबा घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

## घरेलू कामगार कायदा फक्त कागदावरच...!

### राज्यातील घरकाम करणारे कामगार अद्यापही सोयी-सुविधापासून वंचित

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१३, ठाणे :** भारतात सर्वप्रथम राज्य सरकारने घर कामगारांसाठी महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार कायदा केला. हा कायदा २०११ मध्ये अंमलात आला. मात्र दुर्दैव असे की, या कायदयाची म्हणावी तशी अंमलबजावणी सरकारी चाकरमान्यांकडून होत नाही. त्यावर सरकारचे नियंत्रण नाही. त्यामुळे ज्यांच्यासाठी हा कायदा करण्यात आला ते राज्यातील घरकाम करणारे आजही या कायद्याच्या माध्यमातून मिळणाऱ्या सोयी-सुविधांपासून वंचित आहेत, असा आरोप राष्ट्रीय घरकाम चळवळीचे राज्य समन्वयक ज्ञानेश पाटील यांनी शुक्रवारी ठाण्यात पत्रकार परिषदेत केला. शिवाय आंतरराष्ट्रीय घरकामगार दिनानिमित्त अर्थात १६जूनला ठाण्यात शासकीय विश्राम गृहाजवळ मानवी साखळीचे आयोजन करण्यात आल्याचे ते म्हणाले. यावेळी दि नॅशनल डोमेस्टिक



वर्कर्स ट्रस्टच्या ठाणे जिल्हा समन्वयक रेखा जाधव उपस्थित होत्या.

महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार कायदानुसार घरकाम करणाऱ्यांना आजारपणाचा खर्च मिळणे आवश्यक आहे. शिवाय कुटुंबाचा आजारपणाचा खर्च मिळणे आवश्यक आहे. पण त्याकडे दुर्लक्ष्य केले जाते. या कायद्यातील कलम १०ची अमलबजावणी होत नाही, अशी खंत पाटील यांनी व्यक्त केली.

राज्यात तालुका पातळीपर्यंत घरेलू कामगारांना नोंदणीकृत करणारी सक्षम यंत्रणा तयार करा!, जिल्हा पातळीवर त्रीपक्ष घरेलू कामगार मंडळाची स्थापना करा, त्रीपक्ष मंडळात घरेलू कामगारच्या संघटना प्रतिनिधित्व द्या!, भांडी वाटप व सन्मानदाराचे थकीत वाटप त्वरित पूर्ण करा!, घरेलु कामगार कल्याण मंडळ कायद्यात नमूद केल्याप्रमाणे त्रिपक्षीय घरेलु कामगार कल्याण मंडळाची जिल्हावार स्वतंत्र स्थापना करा व हे होईपर्यंत कायद्यातील कलम १० मधील तरतुदीनुसार नोंदीत घरकामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती / घरकामगार महीलेचा अपघात विमा व कौटुंबिक आजारपण व औषधोपचाराचा खर्च देणे चालू करा. अशा मागण्या पाटील यांनी केल्या आहेत.

शिवाय, महाराष्ट्र राज्य कल्याण मंडळ अधिनियम अधिक सक्षम करण्याकरता, घरेलू कामगार ज्या मुख्य मालकांकडे काम करतात त्यांना नोंदणीकृत करा, घरेलू कामगारांना सामाजिक सुरक्षा अधिकार म्हणजे राज्य कामगार विमा योजना लागू करा, भविष्य निर्वाह निधी, तसेच वृध्दापकाळासाठी पेन्शन आदी अधिकारांचा स्पष्ट उल्लेख करा व ते अधिकार त्यांना लागू करा!, घरेलू कामगारांना किमान वेतन, साप्ताहिक रजा व इतर रजा तसेच बोनसचा अधिकाराचा स्पष्ट उल्लेख कायद्यामध्ये करा!, घरेलू कामगार कल्याण मंडळला विविध योजना राबविण्याकरता आर्थिक दृष्ट्या सक्षम करा व त्याकरिता मुख्य मालकावर लेव्ही आकारा किंवा गृह उपयोगी वस्तूवर विशेष कर आकारून तो पैसा मंडळाकडे वर्ग करा!, घरेलू कामगारांना कामे देण्याच्या नावाखाली सुरू झालेल्या एजन्सी व इतर कंपन्यांवर नियंत्रण आणा व घरेलू कामगारांचे शोषण होणार नाही याची हमी निर्माण करा! अशा मागण्या राष्ट्रीय घरकाम चळवळीचे राज्य समन्वयक ज्ञानेश पाटील यांनी केल्या

# संपादकीय



## दिल्लीवर 'देवी' प्रसन्न!

दिल्लीच्या रस्त्यांवर गेले काही दिवस एक नेत्रसुखद 'हिरवळ' दिसू लागली आहे. नाही नाही 'हिरवळ' शब्दाचा भलताच अर्थ घेऊ नका! राजधानीच्या रस्त्यांवर आता हिरव्या रंगाच्या छोट्या छोट्या इलेक्ट्रिक बसगाड्या धावताना दिसत आहेत. दिल्लीतील नव्या सरकारने या बससेवेला दिल्ली इलेक्ट्रिक व्हेइकल इंटरचेंज म्हणजे 'देवी' असे नाव दिले आहे. एखाद्या संस्था-उपक्रमाला असे इंग्रजी नाव ठेवायचे की त्याचे एखादे चटपटीत लघुरूप तयार व्हावे.

गेल्या ११ वर्षांतल्या याच प्रघाताचा 'देवी' बस हा नवा प्रयोग. तिकीट वगैरे कुछ नही.. सारेच फ ुकटात प्रवास करा, या आधीच्या आप सरकारच्या धोरणामुळे आचके देणाऱ्या दिल्ली परिवहन बससेवेला (डीटीसी) या देवी बसमुळे जणू नवी पालवी फुटली आहे! अरविंद केजरीवाल यांच्या मूळ कल्पनेतून आप सरकारच्या काळात या नव्या बसगाड्यांची खरेदी झाली होती. वर्तमान भाजप सरकारने त्यांचा वापर व विस्तारही सुरू केलाय. याबाबतच्या फाईलला नायब राज्यपालांकडे ठेच लागण्यापूर्वी केजरीवाल यांच्या मनात यासाठी 'मोहल्ला बस' हे नाव होते असो. पण दिल्लीच नव्हे तर श्वास कोंडलेल्या देशातील अन्य महानगरांनाही यासारख्या मिनी बससेवेची नितांत गरज आहे.

पूर्णपणे इलेक्ट्रिक असलेल्या या प्रत्येकी २३ आसनी देवी बस ४५ मिनिटांत पूर्ण चार्ज होतात आणि त्यात किमान २२५ किमी. प्रवास करू शकतात. डीटीसीच्या हत्तीसारख्या अवाढव्य बसगाड्या ज्या लहान रस्त्यांवर पोहोचू शकत नाहीत तेथपर्यंत, तसेच मेट्रो स्थानके आणि डीटीसीच्या मुख्य बस मार्गांशी कनेक्टिव्हिटी सुधारणे हा देवी बस उपक्रमाचा उद्देश आहे. प्रत्येक गाडीत सहा जागा महिलांसाठी राखीव असणाऱ्या या गाड्या सध्या सुमारे ४५ मार्गांवर ३२ किमी.पर्यंत प्रवास करतात. सध्या धावणाऱ्या या ४०० देवी बसगाड्यांना दिल्लीकरांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे. या वर्षाअखेर दिल्लीत २०८० देवी बसगाड्या चालवायच्या, असा विडा रेखा गुप्ता सरकारने उचलला आहे. इलेक्ट्रिक असल्याने देवी बसगाड्या पर्यावरणपूरक देखील आहेत. केजरीवाल सरकारच्या पिंक पासमुळे महिलांना या बसेसमध्येही मोफत प्रवास सुविधा द्यावीच लागते आहे.

दिल्लीतील वाहतुकीसाठी एकाप्रकारे देवी प्रसन्न झाल्याचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर देशाच्या विविध महानगरांतील सार्वजनिक वाहतुकीचा गंभीर झालेला प्रश्न डोळ्यांसमोर येतो. बेबंद शहरीकरण हा त्यातील एक महत्त्वाचा पैलू. दिल्लीच नव्हे तर मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, चेन्नई, बेंगळुरू, हैदराबाद, कोलकाता असा सर्वच महानगरांत तासनतासांची वाहतूक कोंडी, सार्वजनिक वाहतुकीची कमतरता, दुचाकींची अमर्याद गर्दी, वाहतूक कोंडी व प्रदूषण यामुळे नागरिकांना दररोज कमालीचा मनस्ताप सहन करावा लागतो आहे.पण, रोजच मरे त्याला कोण रडे, या धर्तीचा हा प्रकार झाला आहे.

'मिनी बस'सेवा हा सकारात्मक प्रयोग ठरणार हे दिसल्याने केंद्र सरकारने इलेक्ट्रिक बससेवेचा विस्तार करण्याची योजना आखली आहे. त्या दृष्टीने दिल्लीतील 'देवी', पुण्याची 'अटल बससेवा' व नागपूरची 'आपली बस' यासारखी उदाहरणे घेता येतील. नाशिकसारख्या ठिकाणी तर जवळपास साऱ्या शहरभर बससेवाच मिनी बसद्वारे चालविली जाते. या बसगाड्या अशोक स्तंभ-रविवार कारंजा यासारख्या अरुंद रस्त्यांवरूनही सहज जात असल्याने नाशिककरांचाही प्रतिसाद त्यांना मिळत आहे. सार्वजनिक वाहतुकीची कमतरता हा शहरांचा गंभीर आजार कसा बनला आहे हे केंद्रीय नगरविकास मंत्रालयाच्या अलीकडच्या अहवालातून पुन्हा समोर आले आहे.

एकट्या मुंबईत लोकल ट्रेनला लटकून रोजीरोटीसाठी धावणाऱ्या कोट्यवधी चाकरमान्यांचे रोज सरासरी किमान तीन तास केवळ प्रवासांतच जातात. हा कालावधी दररोज दीड ते दोन कोटी मनुष्य तास इतका महाप्रचंड असतो, हे लक्षात घेतले तर आपण कोणत्या कड्याच्या टोकावर उभे आहोत याची कल्पना येते. मेट्रो यशस्वी ठरलेल्या दिल्लीत प्रवासाचा कालावधी तुलनेने किंचित कमी असला तरी कोट्यवधी वाहनांमुळे अनेक भागांतील वाहतुक कोंडीची समस्या कायम आहे. सद्यस्थिती अशी की उच्चपदस्थ बाबूच नव्हे तर मंत्र्यांचे ओएसडीदेखील एकेकटेच वाहनांतून जातात. एकूण २२ शहरांत मेट्रो पोहोचली तरी सर्वसामान्यांनी ती सार्वजनिक वाहतुकीचा सशक्त पर्याय म्हणून स्वीकारल्याचे सर्वव्यापी चित्र अजून तरी नाही.

# देशावर झालेला काळाचा दुर्दैवी 'आघात'

- अनंत बोरसे -
शहापूर जिल्हा ठाणे
मो.९१५८४९५०३७

गुरुवारचा वार देशासाठी घात वार ठरला आणि मोठा आघात करून गेला. कुणाच्याही ध्यानीमनी नसताना अनपेक्षितपणे अहमदाबाद येथून २४१ प्रवाशांना लंडनला घेऊन निघालेले विमान अचानकपणे जवळच्याच रहिवासी भागात कोसळले दुर्दैवाने विमानातील २४० तसेच इतर २०-२५ असा एकुण २६५ नागरिकांचा मृत्यू झाला केवळ सुदैवाने एक प्रवासी या अपघातातुन आश्चर्यकारक रित्या दैव बलवत्तर म्हणून बचावला.




या विमान दुर्घटनेत गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा देखील दुर्दैवी मृत्यू झाला मात्र सुदैवाने रहिवासी भागात मोठी जिवितहानी व वित्तहानी झाली नाही. विजय रूपाणी हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जवळचे सहकारी. या विमान दुर्घटनेत १६९ भारतीय त्याखालोखाल ब्रिटन चे ५३ तसेच इतर अन्य देशांचे प्रवासी मृत्यू पावले आहेत. यात विमान कंपनीचे देखील मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.तसेच या विमान अपघातात मृत्यू पावलेले मुख्य पायलट सुमित सभरवाल यांना जवळपास आठ हजार तासांच्या हवाई ऊड्डाणाचा अनुभव होता आणि ते मुंबई चे रहिवासी होते.मुंबईतील कोळीवाडा डोंबिवली आणि बदलापूर येथे रहाणारे तीन क्रु सदस्य तर सांगोला येथील पवार दाम्पत्य यांचा देखील दुर्दैवी मृत्यू झाला, पवार दाम्पत्य हे लंडन येथे आपल्या मुलाला भेटण्यासाठी चालले होते मात्र मुलाची भेट काही होऊ शकली नाही. पिंपरी चिंचवड येथे रहाणारा इरफान या क्रु मेंबरचा देखील अवघ्या २२ व्या वर्षी मृत्यू झाला. या विमान अपघातात एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला. तर मुंबई महाराष्ट्रातील दहा जणांचा मृत्यू झाला आहे. हे विमान बोईंग ७८५ ड्रिमलायनर प्रकारातील होते. या विमानाने अहमदाबाद वरून प्रयाण करण्यापुर्वी दिल्लि अहमदाबाद प्रवास केला होता. बोईंग प्रकारातील विमान निर्मिती करणारी अमेरिकन कंपनी असुन गेल्या अनेक वर्षांपासून विविध देशांमधून या प्रकारची विमाने ये जा करतात. हे एअर इंडियाचे बोईंग विमान होते आणि २००८ सालापासून ते आंतरराष्ट्रीय ऊड्डाण करत होते. आजवर बोईंग जातीच्या विमानाचे सहा हजार अपघात झाले असुन नऊ हजार जणांचा मृत्यू झाला आहे यात जवळपास २५० अपघात हे गंभीर झाले आहेत. बोईंग अपघातात एमईएससी सीस्टम कारणीभूत असल्याचे सांगितले जाते. आता या विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला असुन अपघाताचे कारण समजु शकेल.

आजवरच्या विमान अपघातातील हा मोठा अपघात आहे. यापुर्वी १९७६ साली मुंबईत एअर इंडियाचे विमान कोसळुन ९६ जणांचा मृत्यू झाला होता. १९७८ मधे मुंबई जवळच्या समुद्रात विमान कोसळुन झालेल्या अपघातात २१३ जणांचा मृत्यू झाला होता. अहमदाबाद येथेच १९८८ एअर इंडिया च्या विमानाला अपघात होऊन १३३ जणांचा मृत्यू झाला होता. १९९६ मधे हरियाणात चरखा दादरी येथे हवेतच दोन परदेशी विमानांची टक्कर होऊन ३४९ जणांचा मृत्यू झाला होता हा आजवरचा सर्वात मोठा अपघात मानला जातो. २०१० साली मंगळुरु विमानतळावर ऊतरता असतांना ते भिंतीला धडकुन झालेल्या अपघातात १५८ जणांचा मृत्यू झाला होता. तर १९९१ मधे ईम्फाळ येथे झालेल्या विमान अपघातात ६९ जणांचा मृत्यू झाला होता.

विमान अपघात कश्यामुळे झाला हे कालांतराने समोर येईलच. एखाद्या विमान अपघातात ५० हुन मृत्यू झाले तर त्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर चौकशी होते ती आता होईलच आणि यातुन अपघाताची कारणे स्पष्ट होतीलच मात्र आधुनिक तंत्रज्ञान बरेच पुढे गेले असुनही, अद्ययावत यंत्रणा असुनही अपघात घडला हे अतिशय दुर्दैवी आहे. लंडन सारख्या लांबच्या पल्यावर जाणार असल्याने या विमानात एक ते सव्वा लाख पेट्रोल होते त्यामुळे आगीचा भडका उडाला आणि अपघातांची तीव्रता वाढली. साधारणपणे विमान लँडिग होतांना अपघात घडतात मात्र विमानाने टेक आँफ घेताच अपघात घडण्याच्या घटनां फार कमी प्रमाणात घडतात. देश एका मोठ्या कठीण काळातुन जात असताना विमान दुर्घटनेमुळे देशावर मोठा दुर्दैवी 'आघात'नमस्कार झाला.ना हवाई प्रवास सुरक्षित राहिला ना रस्त्यावरील प्रवास ना रेल्वेचा प्रवास सुरक्षित राहीला आहे.

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान !



आज १४ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ कार्ल लॅडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जून हा त्यांचा जन्मदिन आहे. डॉ कार्ल लॅडस्टेनर यांनी 'एबीओ' हा नवा रक्तगट शोधून काढला त्यांच्या या संशोधनासाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले होते. पहिला जागतिक रक्तदाता दिन २००५ साली साजरा झाला होता.

त्यानंतर दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी एक सूत्र घेऊन हा दिवस साजरा केला जातो. माता सुरक्षा, रक्तदान श्रेष्ठ दान, डोनेट प्लेटलेट्स यासारखे सूत्र घेऊन त्याची माहिती या दिवशी दिली जाते. रक्तदानाचे आवाहन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेल्या या दिवसाच्या साजरीकरणात रेड क्रॉस सोसायटीचा हिरीरीने भाग असतो. कौन्सिल ऑफ युरोप ही संघटना देखील रक्तदाना संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करते. आपल्या देशात देखील विविध शासकीय, सामाजिक, सेवाभावी संस्था या दिवसाचे आयोजन करून लोकांमध्ये रक्तदाना संदर्भात जनजागृती करतात. या दिवशी रक्तदात्यांच्या सन्मान केला जातो. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदान श्रेष्ठ दान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे माणसाचा जीव वाचतो. सुरक्षित रक्त ही अलीकडची वैश्विक समस्या निर्माण झाली आहे. दरवर्षी ९ कोटी युनिटपेक्षा अधिक रक्त दान केले जाते तरीही रक्ताचा तुटवडा जाणवतो. अपघातग्रस्त व्यक्ती, शस्त्रक्रिया झालेले व्यक्ती, रक्तातील त्रुटी असलेले व्याधीग्रस्त व्यक्ती, बाळंतपणात होणारे मातांचे मृत्यू आणि कुपोषण, विविध प्रकारचे बाळ मृत्यू, साथीचे आजार अशावेळी रक्ताची खूप गरज पडते. कोरोना काळात तर रक्ताचा कसा अभूतपूर्व तुटवडा जाणवला होता हे आपण पाहिलेच आहे. कोरोना काळात रक्तदान शिबिरे बंद असल्याने देशात रक्तदानाचा अभूतपूर्व असा तुटवडा जाणवला होता. रक्ताच्या तुटवड्यामुळे अनेक शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांना रक्तदान करावे असे आव्हान केले होते. भविष्यातही रक्ताचा असा तुटवडा निर्माण होऊ शकतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो. म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात.

रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही. मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही. विशेष म्हणजे २४ ते ४८ तासात जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पुढे येऊन रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असे म्हणून प्रचार होत असला तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खुपच कमी आहे. भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात हे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते त्यात कोरोना सारख्या महामारीत तर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होते. अपघातातील रुग्ण, प्रसव काळ, अतिदक्षता विभाग, तातडीच्या शस्त्रक्रिया अशा वेळी रक्ताची गरज निर्माण होते जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने सजग राहायला हवे. आपल्या रक्तामुळे कुणाचा तरी प्राण वाचणार आहे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२२५४६२१५**

## ब्लॅक बॉक्स..

ब्लॅकबॉक्सविमानी
कथन करणारं सारे
इथंभूत माहिती देई
उघडली मृत्यूचीदारे

ब्लॅकबॉक्ससंजीवन
अ क्षयत्व मिळे खरे
सत्य दर्शन घडवे तो
इथे ना कसले नखरे

मशीनरीनिर्जीव जरी
स जीव चित्रा चितारे
स्पष्टता स्फटिक सम
ना तोडे अक्कल तारे

संशोधन दुर्घटनेनंतर
सोईस्कर या आधारे
संधी मिळे पश्चात्तापा
चुकांसपुढल्या सुधारे

पराधीन आहो जगती
मनुष्य कधी न विसरे
नवी दिशा जगण्याची
दे जीवनलोभस हसरे

ब्लॅकबॉक्स असाएक
या मना मनात हवा रे
परिक्षणा कृत कर्माचे
आधार देईलं जीवा रे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# पायलट दीपक पाठक यांचे अहमदाबाद विमान दुर्घटनेत निधन..

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.१३, विंचूर (नाशिक)** : निफाड तालुक्यातील नाशिक - छत्रपती संभाजीनगर रोडवर असलेल्या नैताळा येथील, अतिशय दुर्दैवी घटना कालच्या विमान दुर्घटनेत नैताळे येथील भुमीपुत्र, बाळासाहेब बाबुराव पाठक यांचा एकुलता एक मुलगा दिपक यांचे दुर्दैवी निधन झाले. ते


एअर इंडिया मध्ये को - पायलट होते.

निफाड तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील जुन्या पिढीतील स्व.बाबुराव पाठक व पंचायत समिती च्या तत्कालीन सदस्या शांताबाई पाठक यांचा हा गुणी नातु आणि रेल्वे खात्यात कार्यरत असणारे बाळासाहेब पाठक यांचा हा मुलगा. परेल च्या बीडीडी चाळीत हे कुंटूब राहत.

भारतमाता पासुन पुढे पायी चालत गेल्यावर बीडीडी चाळीतील बिल्डींग मध्ये यांचे वास्तव्य. रिटायर नंतर बदलापूर ला वास्तव्यास आले होते.

काल ची घटना या परिवारा साठी अतिशय दुर्दैवी. नैताळे सह परिसरात दिपक यांच्या अचानक जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# आचार्य अत्रे यांना अभिवादन वरळी चौकात पुण्यतिथी साजरी

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१३, मुंबई :** मुंबई येथे मुंबई महापालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडणारे अत्रेच होते. महाराष्ट्र कृती समिती स्थापनेत अत्रेचा पुढाकार होता. महाराष्ट्रासाठीच जगण्या मरण्याची भावना मराठी माणसांच्यात चेतवत ठेवण्याचे काम अत्रे व त्यांच्या लेखणीने समर्थपणे केले. अत्रे यांच्या वाणी व लेखणीने लढ्यात दिलेले योगदान फार प्रभावी व अमूल्य आहे.

अत्रे यांचे विविध पैलू असलेले व्यक्तिमत्त्व प्रसिद्ध आहेच. मुंबईसह अपेक्षित महाराष्ट्र' राज्य नावास आकाराला येण्यात अत्रेचा वाटा मोठा आहे. विविध मार्गानी अत्रे यांनी संयुक् महाराष्ट्र निर्मितीची गाथा लोकमनात रुजविली त्यामुळे हा लढा यशस्वी झाला. मुंबई मिळवण्यासाठी मराठी माणसांनी जो त्याग केला लढा उभारला ते सध्याची मुंबईची



परिस्थिती पाहता भविष्यात मुंबईवर मराठी माणसांचा सर्वाधिकार राहील काय याचे आत्मपरीक्षण आजच्या महाराष्ट्रातील मराठी राज्यकर्त्यांनी करायला पाहिजे. निरक्षर कवयत्री बहिणाबाई यांच्या कविता अत्रे यांनी अधाशासारख्या वाचल्या आणि त्यांना आणि त्यांचे साहित्य महाराष्ट्रापुढे आणले. अत्रेसाहेब हे महाराष्ट्राचे सर्वव्यापी बलदंड व्यक्तिमत्व होते. अशी भावना कुटुंब रंगलय काव्यात चे विसुभाऊ बापट, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे आणि शरद बर्डे यांनी व्यक्त केली.


साहित्य सम्राट आचार्य अत्रे यांच्या ५६ व्या पुण्यस्मरणार्थ मुंबई वरळीनाका येथील आचार्य अत्रे चौकात त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यापुढे अत्रेसाहेबांना अभिप्रेत असे अनेक उपक्रम राबविण्यासाठी यापुढे आचार्य अत्रे समिती महाराष्ट्र राज्य या नावाची संस्था स्थापन होत असल्याची घोषणा आरती सदावर्ते-पुरंदरे यांनी केली. कार्यक्रमाला ज्येष्ठ निवेदिका मधू मंजिरी गटणे, श्रीकांत मयेकर, श्रीमती सविता झेंडे या उपस्थित होत्या.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बोरीतील वीज समस्यांबाबत वीर योद्धा प्रतिष्ठानचे महावितरणला निवेदन

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.१३, खंडाळा (सातारा) :** मौजे बोरी ता.खंडाळा गावातील लक्ष्मीदेवी मंदिराशेजारी व परिसरातील असलेल्या पिंपळाचे व वडाच्या झाडाच्या फांद्या या विद्युत वाहक तारेला चिकटत असल्याने गावातील नागरिकांच्या जीवाला धोका पोहोचू शकतो तो धोका टाळण्यात यावा. यासाठी वीर योद्धा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष बापू विजयराव ढावरे यांच्या आदेशानुसार व वीर योद्धा प्रतिष्ठान खंडाळा तालुका यांच्यावतीने शुक्रवार, दिनांक १३ जून २०२५ रोजी लोणंद येथे महावितरणचे उप अभियंता रेड्डी यांना भेटून निवेदन देण्यात आले. आपल्या विभागात येणाऱ्या विद्युत वाहक तारेला बोरी गावठाणातील काही झाडांच्या फांद्या लागत असून ती झाडे लवकरात लवकर काढून टाकण्यात यावीत. जर कोणत्याही नागरिकाचा जीव गेला तर यास सर्वस्वी आपण जबाबदार राहाल अशा पध्दतीचे निवेदन देण्यात आले. यावेळी वीर योद्धा प्रतिष्ठान खंडाळा तालुका अध्यक्ष सलीम भाई शेख, खंडाळा तालुका उपाध्यक्ष स्वप्नील भाऊ जावळे, प्रफुल्ल जावळे, राहुल वेळे, किरण दादा खंडागळे, प्रकाश जावळे, मारूती जावळे व सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## जेएनयू विद्यापीठाच्या न्यायालयीन समितीवर खा. रजनीताई पाटील यांची निवड

**अक्षराज : शिवाजी औसेकर**



**दि.१३, केज :** दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या न्यायालयीन समितीच्या सदस्यपदी कॉंग्रेसच्या राज्यसभा खा.रजनीताई अशोकराव पाटील यांची निवड झाली. राज्यसभेच्या अध्यक्षांनी सदस्यत्वाचे मानांकित केले आहे. जगातील काही प्रमुख विद्यापीठांपैकी महत्वाच्या आणि वैचारीक म्हणून ओळख असलेल्या जेएनयू विद्यापीठाच्या न्यायालयीन सदस्यपदावर खा. रजनीताई पाटील,डॉ.सुधांशू त्रिवेदी, डॉ. सस्मित पात्रा ,डॉ. अशोक कुमार मित्तल आदींची निवड करण्यात आली आहे. समिती समन्वय विभागाचे महासचिव पीसी.मोडी यांनी याबद्दल अभिनंदन केले आहे.

जेएनयु विद्यापीठात माझे शिक्षण झाले त्याच विद्यापीठाच्या न्यायालयीन समितीवर काम करण्यास विशेष आनंद आहे. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी काम करत राहणार असल्याचे खा.पाटील यांनी सांगितले.

## यतीन कदम यांचा लासलगाव येथे भाजपा मंडलातर्फे जाहीर सत्कार



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, लासलगाव (नाशिक) :** भारतीय जनता पक्षाच्या वतीने यतीन कदम यांची नाशिक ग्रामीण उत्तर जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल भाजपा लासलगाव मंडलातर्फे व कृ.उ.बा. समितीचे सभापती डी. के. जगताप (नाना) व भाजपा. नाशिक जिल्हा ग्रामीण उत्तर महाराष्ट्र महामंत्री सुवर्णा जगताप, मंडल अध्यक्ष निलेश सालकाडे यांच्या हस्ते लासलगाव येथील गणेश मंदीराच्या प्रांगणात सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी बाजार समितीचे सभापती डी. के. जगताप यांनी आपले मनोगत व्यक्त करताना ,यतीन कदम यांना राजकीय वारसा लाभला आहे. यापूर्वी जिल्हा परिषद सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले आहे .त्यामुळे त्यांना जनसामान्यांच्या प्रश्नांची चांगली जाणीव आहे. लासलगाव बाजार समितीच्या माजी सभापती तथा संचालिका व भा.ज.पा. नाशिक जिल्हा ग्रामीण उत्तर च्या अध्यक्षा सुवर्णा जगताप यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. एक अभ्यासू व सामाजिक सामाजिकतेचे भान असलेले असे व्यक्तिमत्व आपल्याला लाभले आहे. नाशिक भागाचा सखोल अभ्यास असल्यामुळे ते जनसामान्याचे नेते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचा मनमिळाऊ स्वभाव व कार्यकर्त्यांना न्याय मिळवून देण्याची त्यांची तळमळ ही त्यांचे प्रमुख वैशिष्ट्य आहेत.लासलगाव मंडलातील प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्ता आणि बुथ प्रमुख, हा यतीन कदमच्या मागे खंबीरपणे उभा राहील.भा.ज.पा. मंडल अध्यक्ष निलेश सालकाडे यांनी मंडलाचा आढावा मांडला आणि उपस्थित सर्वांच्या वतीने पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी यतीन कदम यांनी भाजपाच्या वतीने सत्कार केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. भारतीय जनता पार्टीच्या वतीने माझा सत्कार सोहळा आयोजित करत भाजप लासलगाव मंडळ नी केलेला हा प्रेमपूर्वक सत्कार अत्यंत नम्रतेने स्वीकारला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित करताना भारतीय जनता पार्टीचा मी एक सामान्य कार्यकर्ता आहे आणि माझ्यावर विश्वास ठेवलेल्या आणि साथ दिलेल्या भाजप कार्यकर्त्यांची आभार मानतो येणाऱ्या पुढील स्वराज्य संस्थेच्या निवडणुका निवडणुकीमध्ये भाजपा च्या जास्तीत जास्त जागा निवडून आणण्याचे आवाहन केले. पक्ष पूर्ण ताकद लावेलच तुम्हीही साथ द्या आणि जिल्ह्यात ताकद दाखवा

कार्यक्रमाचे निमित्ताने अध्यक्ष यतिन कदम यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केल.भाजपा ज्येष्ठ नेते राजेंद्र चाफेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी अल्पोपहाराचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाप्रसंगी भाजपा चे बापूसाहेब पाटील, ॲड. वाल्मीकराव गायकवाड, राजूशेठ राणा, संतोष पलोड, निलेश सालकाडे, रमेश पालवे,शेखर होळकर, दत्तोपंत डुकरे, सोमनाथ गांगुर्डे, तुकाराम गांगुर्डे, दतूलाल शर्मा, डॉ. सालगुडे, मनीष चोपडा, निलेश लचके, आयाज शेख, डॉ. योगेश डुंबरे, लक्ष्मण खालसे, सचिन लचके, निलेश जगताप, सुरेश बकरे, संतोष राजोळे, सागर शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, गणेश फड, राजू नागरे, संजय महाले, सुशील भोसले, सुनील नेवगे, नवनाथ जाधव, अनिल सोनवणे, अरुण भामरे, विजय कांकरिया, माया खिलवाणी, ओम् चव्हाण,उषा कुमावत, रंजना शिंदे, ज्योती शिंदे, शैलजा भावसार, शीतल शिंदे, पूजा भावसार, सोनाली शिंदे, रश्मी माठा, नंदा शर्मा, मंजुषा केंगे, भारती महाले, सिंधू पल्हार सर्व बूथ प्रमुख, मंडलातील सर्व भाजपा कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाटण येथील प्रशासकीय इमारतीस छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव द्यावे...

### सत्यजितसिंह पाटणकर यांची मुख्यमंत्र्यांकडे पहिलीच मागणी...

**अक्षराज : सुरेश संकपाळ**



**दि.१२, पाटण :** पाटण येथे नव्याने उभारण्यात येत असलेल्या तहसिल तसेच विविध शासकीय कार्यालयांचा समावेश असलेल्या बहुउद्देशीय प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरू आहे. तालुक्याच्या ठिकाणी उभारण्यात येत असलेल्या या अद्यावत प्रशासकीय इमारतीस छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सत्यजितसिंह पाटणकर यांनी मुंबई येथे निवेदनाद्वारे केली आहे. शिवजयंती उत्सव समिती, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, सुंदर स्वराज्य प्रतिष्ठान सुंदरगड संवर्धन समिती, हिंदू एकता आंदोलन अशा विविध संस्था- संघटनांनी या मागणीचे निवेदन सत्यजितसिंह पाटणकर यांच्याकडे दिले होते.

समृध्द असा ऐतिहासिक वारसा लाभलेली पाटणची ही भूमी साक्षात छत्रपती शिवप्रभूच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. सुंदरगड तथा दातेगड, गुणवतगड, जंगली जयगड, भैरवगड हे त्याचे साक्षीदार असून ऐतिहासिक चाफळ क्षेत्री शिंगणवाडी येथे समर्थ रामदास स्वामी व शिवछत्रपती यांची ऐतिहासिक भेट झाली आहे. दृढ निर्धार, समर्पण, त्याग निष्ठा आणि पराक्रमाच्या बळावर छत्रपती शिवाजीमहाराज यांनी रयतेच्या न्याय, हक्काचे स्वराज्य निर्माण करून अठरापगड जाती धर्मातील लोकांना सुरक्षित केले. रयतेच्या हिताचा कारभार करतांना त्यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय हा सर्वसामान्य जनतेच्या हिताला न्याय देणारा होता.

आज तालुक्यातील सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या कामकाजाच्या निमित्ताने पाटण मध्ये नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु असून येणाऱ्या काळात या इमारती मधून पाटण तालुक्यातील सर्वसामान्य जनतेच्या हिताचे निर्णय तसेच त्यांच्या अडीअडचणी सोडविल्या जाणार आहेत, अशावेळी या बहुद्देशीय प्रशासकीय इमारतीस रयतेचे राजे छत्रपती शिवाजीमहाराज यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी आम्ही आपणाकडे या निवेदनाव्दारे नम्रपणे करीत आहोत, या नवीन प्रशासकीय इमारतीस छत्रपती शिवाजी महाराज यांचे नांव दिले गेल्यास येथे काम करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्यास व कामानिमित्त येणाऱ्या जनतेला त्यापासून प्रेरणा मिळेल.

## आजपासून पुण्यात रंगणाऱ्या १ल्या आदित्य चषक १८वर्षाखालील युवा कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, मुंबई :** महाराष्ट्र राज्य व पुणे जिल्हा कबड्डी असो. च्या मान्यतेने शिवशक्ती महिला संघाने दिनांक १४ ते १८ जून २०२५ या कालावधीत आयोजित १ल्या आदित्य चषक १८वर्षाखालील मुले व मुली राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेची गटवारी आज जाहिर करण्यात आली.मुंबई उपनगर पूर्व विरुद्ध मुंबई शहर पश्चिम या मुलींच्या, तर सांगली विरुद्ध पुणे ग्रामीण या मुलांच्या सामन्याने या स्पर्धेला प्रारंभ होईल.पुण्यातील म्हाळुंगे येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज बंदिस्त क्रीडा संकुलात खेळविण्यात येणार आहेत.आमदार सचिन अहिर यांनी या स्पर्धेचे शिवधनुष्य पेलले आहे.

महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेला संलग्न असलेल्या २५ जिल्ह्याचे ३१ संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या संघांची ८ गटात विभागणी करण्यात आली आहे. स्पर्धा मॅट्च्या ४ क्रीडांगणावर खेळविण्यात येतील.सामने सकाळ व सायंकाळ या दोन्ही सत्रात प्रखर विद्युत झोतात खेळविण्यात येतील.या स्पर्धेचे उद्घाटन शनि. दि.१४ जून रोजी सायं.०५-०० वा.शिवसेनेचे युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.तद्प्रसंगी खासदार व सामनाचे संपादक संजय राऊत,आमदार सचिनभाऊ अहिर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.स्पर्धेची सर्व तयारी जवळपास पूर्ण होत आली असून सचिन अहिर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली शिवशक्ती महिला संघाचे कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत.आज ही गटवारी महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी सर्व प्रसार माध्यमासाठी जाहीर केली. ती खालील प्रमाणे.

**मुली :-**

१) अ गट :- १)नाशिक शहर, २)मुंबई उपनगर पश्चिम, ३)ठाणे ग्रामीण.
२) ब गट :- १)पिंपरी चिंचवड, २)नंदुरबार, ३)नांदेड, ४)बीड.
३) क गट :- १)परभणी, २)रत्नागिरी, ३)जळगांव, ४)सोलापूर.
४) ड गट :- १)सांगली, २)ठाणे शहर, ३), सातारा, ४)औरंगाबाद.
५) इ गट :- १)पुणे ग्रामीण, २)अहमदनगर, ३)पालघर, ४)धुळे.
६) फ गट :- १)नाशिक ग्रामीण, २)कोल्हापूर, ३)लातूर, ४)हिंगोली.
७) ग गट :- १)जालना, २)पुणे शहर, ३) उस्मानाबाद, ४)सिंधुदुर्ग.
८) ह गट :- १)मुंबई उपनगर पूर्व, २)रायगड, ३)मुंबई शहर पश्चिम, ४)मुंबई शहर पूर्व.

**मुले :-**

१) अ गट :- १)परभणी, २) जळगांव, ३)बीड.
२) ब गट :- १)पिंपरी चिंचवड, २)पुणे शहर, ३)रायगड, ४)सोलापूर.
३) क गट :- १)रत्नागिरी, २)नांदेड, ३)मुंबई उपनगर पूर्व, ४)सिंधुदुर्ग.
४) ड गट :- १)जालना, २)पालघर, ३)नाशिक शहर, ४)हिंगोली.
५) इ गट :- १)ठाणे ग्रामीण, २)उस्मानाबाद, ३)नाशिक ग्रामीण, ४)सातारा.
६) फ गट :- १)कोल्हापूर, २)औरंगाबाद, ३) धुळे, ४)मुंबई शहर पूर्व.
७) ग गट :- १)मुंबई उपनगर पश्चिम, २) अहमदनगर, ३)लातूर, ४)ठाणे शहर.
८) ह गट :- १)नंदुरबार, २)सांगली, ३)मुंबई शहर पश्चिम, ४)पुणे ग्रामीण.

## भिवंडीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी खा.बाळ्या मामा पुन्हा उतरले रस्त्यावर

**अक्षराज : रविंद्र खाडे**



**दि.१३, शहापूर :** भिवंडीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न खूपच जटिल झाला असून ही समस्या सोडवण्यासाठी भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे यांची संबंधित यंत्रणेची तातडीची बैठक बोलावून वाहतूक कोंडीवर तत्काळ मार्ग काढण्याच्या व अपूर्ण कामे पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

भिवंडीतील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली असून नेहमीच्या वाहतूक कोंडीत प्रवाशांसह वाहन चालकांना तासंतास अडकून पडावे लागत असल्याने वाहतूक पोलीस यंत्रणे विरोधात नागरिकांचा रोष वाढला आहे. भिवंडीतील वाहतूक कोंडीची दखल भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार बाळ्या मामा यांनी घेतली असून शुक्रवारी खासदार बाळ्या मामा यांनी पुन्हा मुंबई नाशिक महामार्गावरील मानकोली नाक्यावर उतरून वाहतूक पोलिसांना वाहतूक सुरळीत करण्यासंदर्भात सूचना दिल्या.

नेहमीच्या वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी खासदार बाळ्या मामा यांच्या नेतृत्वाखाली मानकोली येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकी प्रसंगी वाहतूक पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांबरोबरच सार्वजनिक बांधकाम विभाग व राज्य महामार्गाचे अधिकारी उपस्थित होते.

भिवंडी शहर व ग्रामीण भागात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या मोठ्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर आज भिवंडी मानकोली येथे महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत सध्याच्या स्थितीत निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीचा आढावा घेण्यात आला, तसेच उपाययोजना सुचविण्यात आल्या असून वाहतूक कोंडी सोडविणे व रस्त्याची अर्धवट कामे मार्गी लावण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत अशी प्रतिक्रिया खासदार बाळ्या मामा यांनी दिली आहे.

## जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना पंढरपूर पोलीसांनी केले १२ तासात गजाआड

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.१४, पंढरपूर :** पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे रोपळे या गावचे शिवारातील हॉटेल शिवशंभू मध्ये दि.०७ जुन २०२५ रोजी रात्री ०१:०० वाची सुमारास यातील फिर्यादी उत्तम बाजीराव गोडगे रा माढा तालुका माढा व त्यांचे मित्र धुमाळ हे गावाकडे जाण्यासाठी वाहनाची वाट बघत थांबले असता त्या ठिकाणी तीन अज्ञात इसमांनी येऊन लोखंडी रोड व लाकडी दांडक्याच्या सहाय्याने फिर्यादी उत्तम गोडगे व धुमाळ यांना डोक्यात व पाठीत मारहाण करून जबर दुखापत करून जबरी चोरी केली होती त्यानंतर दिनांक ०८ जुन २०२५ रोजी मौजे रोपळे तालुका पंढरपूर आष्टी रोडवर रात्री ०८:०० वाचे सुमारास फिर्यादी भैरवनाथ संजय नाडकर राहणार मुंगशी तालुका माढा हे रोडने जात असताना त्यांना चार अनोळखी इसमानी रस्त्यामध्ये अडवून मारहाण करून जबर दुखापत करून त्यांच्या ताब्यातील मोटर सायकल किंमत रुपये ७५ हजार रुपयेची मोटर सायकल जबरदस्तीने चोरून घेऊन गेले. सदर दोन्ही घटनेबाबत पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे ४८९/२५ व ४९१/२५ BNS कलम ३०९ वगैरे प्रमाणे दोन्ही घटनेच्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलीस ठाणेस गुन्हे दाखल होते. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने माहिती मिळताच पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर यांनी तपासाची वेगवेगळी तपास पथके तयार करून फिर्यादीने सांगितलेल्या आरोपींच्या वर्णनावरून गुन्ह्यातील आरोपींचा मौजे आष्टी ता मोहोळ या भागात शोध घेऊन सदर गुन्ह्याचे तपास कामी एकूण तीन आरोपींना१/ तुषार सुनील कोळेकर वय २३ वर्षे राहणार पंढरपूर सध्या आष्टी मोहोळ २/सुरज देशमुख राहणार मोहोळ ३/ राहुल फाळके राहणार मोहोळ असे तीन आरोपींना ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता सुरुवातीला आरोपींनी उडवा उडवीची उत्तरे दिली त्यानंतर आरोपींकडे सखोल तपास केला असता. आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिलेली असून आरोपींनी गुन्ह्यात चोरलेली रक्कम व मोटर सायकल किंमत रुपये ७५ हजार असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे एकूण ३ आरोपींना अटकेची कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, सपोनि विश्वास पाटील पोसई कवितकर, सहाय्यक फौजदार दत्तात्रय तोंडले विजयकुमार गायकवाड पोलीस हवालदार स्वप्निल वाडदेकर, पोलीस हवालदार सज्जन भोसले, पोलीस हवालदार इरफान शेख, पोलीस कॉन्स्टेबल गोंगाने,पोलीस कॉन्स्टेबल संतोष चव्हाण, विजयकुमार आवटी सुर्वे पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी, पोलीस कॉन्स्टेबल रामकृष्ण खेडकर हसेन नदाफ यांच्या पथकाने केली.

# धोकादायक इमारतीतून परिवहनचा कारभार

## कर्मचाऱ्यांना जीव मुठीत धरून करावे लागते काम



**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१२, ठाणे :** परिवहन सेवेतील वागळे आगार येथील प्रशासकीय इम ारत तसेच वाहतूक भवन इमारतींचे सन १९९८ साली बांधकाम करण्यात आले पण तेव्हापासून कुठल्याही मोठ्या स्वरूपाच्या दुरुस्तीचे काम न झाल्याने या दोन्ही इमारतींच्या बाहेरील बाजूतील भिंत व आरसीसी बांधकाम नादुरुस्त झाल्याम ुळे सन २०१७ रोजी स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असता या दोन्ही इमारती ३२-इ श्रेणीत दर्शविल्याने इमारतींची तातडीने दुरुस्ती केल्यास इमारतीचे आयुर्मान किमान १५ ते २० वर्षे वाढेल असे वर्तविले होते. परंतु या स्ट्रक्चरल ऑडिटला ८ वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटून देखील कुठले ही दुरुस्तीचे काम न केल्याने इमारतींची दुर्दशा झाल्याने कर्मचार्यांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत असल्याची बाब ठाणे काँग्रेस चे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी आयुक्तांना पत्राद्वारे निर्दशनास आणून दिली आहे.

महापालिकेकडून विविध प्रकल्पांवर हजारो कोटी खर्च परंतु परिवहनकडे मात्र दुर्लक्षयाबाबत काँग्रेसच्या शिष्टमंडळाने परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे यांची भेट घेत इमारतींची पाहणी केली असता वाहतूक भवन या इमारतीत कंडक्टर ड्रायवरचा रेस्ट रूम, तिकिटांचा साठा, रेकॉर्ड रूम, कॅश रूम, युनियन ऑफिस असून इमारतीचे कॉलम बीम व बाहेरील बाजूतील प्लास्टर बरेच ठिकाणी खराब झाले असून लीकेजचा प्रॉब्लेम असून इमारतीचे आतील भागातील प्लास्टर पडत असल्याचे निर्दशनास आले. यावेळी बोलताना राहुल पिंगळे यांनी सांगितले की, ठाणे महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी पावसाळ्यापूर्वी शहरातील धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून यादी जाहीर केली जाते. कारण धोकादायक इम ारती पावसाळ्यात कोसळून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता असते. यापूर्वी देखील अशा घटना घडल्या असून त्यात नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. असे असताना देखील उपमुख्यमंत्र्यांच्या मतदार संघातील व परिवहन मंत्र्यांच्या शहरातील परिवहनच्याच धोकादायक झालेल्या व शेकडो कर्मचारी काम करत असलेल्या स्वतःच्या इमारतींकडे मात्र महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.भविष्यात कोणतीही मोठी दुर्घटना घडू नये याकरता या दोन्ही इमारतींचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती अथवा अतीधोकादायक ठरल्यास त्यांचा पुनर्विकास हाती घेणे आवश्यक आहे. यावेळी त्यांच्या सोबत माजी परिवहन सदस्य भालचंद्र महाडिक, सेवादल अध्यक्ष रवींद्र कोळी, महिला अध्यक्ष स्मिता वैती, संगीता कोटल, सुमन वाघ, श्रीरंग पंडित, अंजनी सिंग, अकिंदर टम ाटा श्रीकांत गाडीलकर, अजिंक्य भोईर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पालकमंत्र्याच्या हस्ते डायलेसिस विभागातील विस्तारीत कक्षाचे उद्घाटन संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपुर येथे डायलेसिस विभागातील विस्तारीत कक्षाचे उद्घाटन राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते व आमदार किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत नुकतेच करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, मा.सां. कन्नम वार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.मिलिंद कांबळे, ताडोबा प्रकल्पाचे उपसंचालक (कोर) आनंद रेड्डी, अति.जिल्हा शल्य चिकित्सक भास्कर सोनारकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.हेमचंद कन्नाके आदी उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री डॉ.अशोक उईके यांनी डायलेसिस विभागातील वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांच्या कामाची प्रशंसा करून पुढेही अशाच प्रकारचे काम करीत राहावे. तसेच रुग्णालयात आलेल्या रुग्णांवर वेळेत आणि चांगले उपचार करावे, अशा सुचना त्यांनी दिल्या.

डायलेसिस विभागामध्ये मासिक ५५० ते ६०० डायलेसिस होतात. सन २०२४-२५ या वर्षात एकूण ६३६८ डायलेसिस करण्यात आले. यासाठी चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयाने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला. जिल्हा रुग्णालयामध्ये सुरुवातीला ९ डायलेसिस मशीन कार्यान्वित होत्या. रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे २० ते २४ रुग्ण हे प्रतिक्षाधीन होते.

रुग्ण हा आरोग्य सेवेपासून वंचित राहू नये, या उद्देशाने पालकमंत्री डॉ. अशोक उईके तसेच जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या म ार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजन समितीम धून ४ नवीन डायलेसिस मशीन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

डायलेसिस विभागाचे विस्तारीकरण झाल्यामुळे आता सर्व डायलेसिस रुग्णांना सेवा देता येईल व कोणत्याही रुग्णांना आर्थिक भुर्दंड बसणार नाही. सामान्य रुग्णालयात सद्यस्थितीत १३ डायलेसिस मशीनद्वारे सेवा देण्यात येत असून प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व नर्सिंग कर्मचारी येथे रुग्णांची सेवा बजावत आहेत. ही सेवा पूर्णपणे मोफत आहे. गरीब व गरजू रुग्णांना याचा मोठा लाभ होणार आहे. डायलेसिस विभाग हा जिल्ह्यातील आरोग्य सुविधांसाठी मैलाचा दगड ठरणार आहे. यामुळे अनेक रुग्णांना वेळेवर आणि योग्य उपचार मिळतील. तरी जास्तीत जास्त डायलेसिस रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य प्रशासनाने केले आहे.

चार रुग्णवाहिकांचेही लोकार्पण जिल्हा सामान्य रुग्णालयात नव्याने दाखल झालेल्या चार नवीन रुग्णवाहिकांचे लोकार्पण पालकमंत्री डॉ.अशोक उईके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खा.प्रतिभा धानोरकर, खा.डॉ.नामदेव किरसान, आ.किशोर जोरगेवार, आ. किर्तीकुमार भांगडीया, आ.देवराव भोंगळे, आ.करण देवतेळे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे आदी उपस्थित होते.

# १६ जूनला महानगरपालिकेच्या सर्व ८० शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, नवी मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या १२ मार्च २०२५ रोजीच्या पत्रानुसार १०० शाळांना भेटी हा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या अनुषंगाने मंत्री, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी हे यावर्षीच्या शालेय वर्ष आरंभाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच दि.१६ जून २०२५ रोजी एकेक शाळेमध्ये भेट देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. याकरिता नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व शाळांमध्ये कार्यक्रम ाचे नियोजन केलेले आहे. कोणत्या शाळांना कोणते अधिकारी भेट देतील याचे पूर्व नियोजन करण्यात आलेले असून शालेय स्तरावर मुख्याध्यापकांनाही याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.



नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागताकरिता गुलाबाची फ ुले, चॉकलेट व्यवस्था तसेच रांगोळी सजावट, वर्ग सजावट करणे, शैक्षणिक साहित्यांचे प्रदर्शन भरविणे, सेल्फी पॉईंट करणे, लेझीमच्या तालावर ढोलताशांच्या गजरामध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करणे अशा विविध प्रकारे हा शालेय आरंभ दिन उत्साहात साजरा केला जाणार आहे. या अनुषंगाने महागनरपालिकेच्या प्रत्येक शाळेम ध्ये स्वच्छता झालेली असून वर्गसजावटीचेही काम सुरू आहे. सुट्टीच्या कालावधीत शाळेला आवश्यक रंगरंगोटी ही करण्यात आलेली आहे. सर्व मुख्याध्यापकांनी आपल्या शाळा व्यवस्थापन समितीची बैठक घेऊन सर्वांना शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी उपस्थित राहण्याबाबत माहिती दिलेली आहे. मान्यवर व्यक्तींना आमंत्रित करण्यात आलेले आहे.

या दिवशी नवीन विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचा संच दिला जाणार असून त्याकरिता पाठ्यपुस्तके शाळांपर्यंत पोहोचलेली आहेत. शाळांनी पाठ्यपुस्तकांवर शाळेचे शिक्के मारून ती वाटप करण्यासाठी तयार ठेवलेली आहेत. विद्यार्थ्यांचे औक्षण ही केले जाणार आहे. विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी, त्यांना कोणत्याही प्रकारचे दडपण वाढू नये व दडपण विरहित आनंददायी वातावरणामध्ये शाळेमध्ये त्यांनी पहिले पाऊल ठेवावे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असून त्यादृष्टीने नवी मुंबई महानगर पालिकेच्या ८० शाळांमध्ये या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या नियंत्रणाखाली नियोजन करण्यात आलेले आहे. म ान्यवरांनी शाळेला भेटी दिल्यानंतर शाळा भेटीचा फॉर्म भरून ठेवण्याबाबतची तयारी ही पूर्ण झालेली आहे. अशाप्रकारे १६ जून रोजी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शिक्षण विभागाची सर्व यंत्रणा सुसज्ज आहे.

# डॉ.श्रीकांत शिंदे यांचा जनता दरबार की जनतेची थट्टा? : रोहिदास मुंडे

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, कल्याण (ठाणे) :** कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी कलवा येथे आयोजित केलेल्या जनता दरबारचा गाजावाजा केला जात असताना, दिव्यात मात्र मागील अकरा वर्षांत एकदाही जनता दरबार भरलेला नाही ˘ ही वस्तुस्थिती किती त्रासदायक आणि दु:खद आहे, हे आज प्रत्येक दिवेकराला प्रकर्षानं जाणवतंय.दिवा विभागातील जनता आजही मूलभूत सुविधा मिळवण्यासाठी संघर्ष करत आहे. हॉस्पिटल नाही,गार्डन नाही, तलाव मृत अवस्थेत, आणि पाण्याची टंचाई, अनधिकृत बांधकामे, कचऱ्याचा प्रश्न, वीज पुरवठा या समस्यांनी सामान्य जनतेचं जगणं असह्य केलं आहे.



अशा गंभीर पार्श्वभूमीवर, कलवा येथे 'जनता दरबार' घेऊन फोटोंमध्ये बुडालेलं लोकप्रतिनिधित्व हे दिवेकरांसाठी फक्त थट्टा वाटतेय. कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी यावर संताप व्यक्त केला जनता दरबार कलवा, डोंबिवली,उल्हासनगर येथे केले जाते मग दिव्यातल्या जनतेचे प्रश्न खासदार कधी सोडवणार. खासदार साहेब, दरबाराचा लोकशाहीत सन्मान आहे, पण तो दरबार जर जनतेसाठी नसून प्रचारासाठी घेतला जात असेल, तर त्याचं रूपांतर केवळ नाट्यशैलीतील दिखाव्यात होतं. दिव्यातील नागरिक विचारतात ˘ दिवा शहर तुमच्या मतदारसंघातच आहे ना? मग इथं दरबार कधी होणार? की दिवा शहर तुमच्या नकाशातूनच गायब झालंय?

जनतेच्या मनात आता एकच सवाल आहे... 'काम ाचा दरबार कधी, की अजूनही फक्त फोटोच?' अशी खरमरीत टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी केली आहे.

# थोडक्यात

## कोपरखैरणे विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊन ही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ.राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत १) निशांत सुरेश नाईक, घर क्र.१३३७, युनिट्स नं.००२, बोनकोडे गाव, कोपरखैरणे, नवी मुंबई व २) सुशांत सुभाष नाईक, घर क्र.१३३७, युनिट्स नं ००४, बोनकोडे गाव, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली. तसेच अनधिकृत बांधकाम धारकानकडून प्रत्येकी रु.२०,०००/- असे एकूण ४०,०००/- रुपये दंडाचे धनादेश वसूल करण्यात आले. सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत धांडे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी/ कर्मचारी व नमुंमपा पोलीस बंदोबस्त उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी मजूर, इलेक्ट्रॉनिक हॅमर, पिकअप व्हॅन, गॅस कटर, वापर करण्यात आले. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## रेल्वे कंत्राटदार यांचा हलगर्जीपणा; खा.निंबाळकर यांनी वेळेत घातले लक्ष



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१२, धाराशिव :** वरुडा रोडवरील शिंदे कॉलेजजवळ रेल्वे कामाच्या ठिकाणी निर्माण झालेल्या धोकादायक स्थितीवर खासदार ओम प्रकाशराजे निंबाळकर यांनी तात्काळ हस्तक्षेप करून मोठा अनर्थ टळला आहे. गुरुवार, दिनांक १२ जून २०२५ रोजी रात्री १०:३० वाजता धाराशिवच्या गोवर्धनवाडी मार्गावरून प्रवास करत असताना ओमराजेंच्या लक्षात आले की, रस्त्यावर प्रचंड चिखल साचल्यामुळे वाहनांची वाहतूक धोकादायक बनली आहे.त्या ठिकाणी एक बोलेरो गाडी खोल चिखलात अडकलेली होती, तर एक रिक्षा व दुचाकी घसरून पडलेल्या अवस्थेत होत्या. नागरिकांची अवस्था पाहून खासदार ओमराजे यांनी तात्काळ आपली गाडी थांबवून जवळील प्लांटवर जाऊन रेल्वे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जाब विचारला. त्यांनी विचारले, रस्त्यावर इतका चिखल असूनही स्वच्छता का करण्यात आलेली नाही? प्रशासनाच्या निष्काळजीपणावर आवाज उठवत, ओमराजेंनी लगेच जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधला.

त्यांनी रस्त्याची दयनीय स्थिती निदर्शनास आणून दिली आणि पोलीस निरीक्षक वठढजअधिकाऱ्यांनाही घटनास्थळी बोलावून घेतले. सर्व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांनी प्रत्यक्ष रस्ता दाखवत समस्या अधोरेखित केली.या हस्तक्षेपामुळे संबंधित रेल्वे कंत्राटदाराला त्वरित रस्ता साफ करण्याचे आदेश देण्यात आले आणि काही वेळातच रस्ता वाहतुकीस योग्य करण्यात आला. या तत्परतेमुळे त्या रात्री होऊ शकणाऱ्या गंभीर अपघातांना आळा बसला. नागरिकांकडून ओमराजेंच्या या तात्काळ कृतीचे सर्वत्र कौतुक होत असून,त यांनी दाखवलेली संवेदनशीलता व जबाबदारी प्रशासनासाठी एक आदर्श ठरत आहे. हेच खरे जनतेचे लोकप्रतिनिधी! असा सूर नागरिकांमध्ये उमटत आहे.

## डॉ.उत्कर्ष मोरे यांचा नगरपंचायतकडून निरोप संपन्न

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.१३, हिमायतनगर (नांदेड) :** शहरातील नगरपंचायत कार्यालयात कर निर्धारक व प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यरत असलेले डॉ.उत्कर्ष भगवानराव मोरे यांची नुकतीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेमध्ये अन्न सुरक्षा अधिकारी गट ब या पदावर निवड झाल्यामुळे शुक्रवार, दिनांक १३ जून २०२५ रोजी त्यांना नगरपंचायत कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्याकडून निरोप देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला उत्कर्ष मोरे यांनी हिमायतनगर शहरातील नागरिकांनी दिलेल्या प्रेमाबद्दल त्यांचा अनुभव कथन करून सर्व गावकऱ्यांचे व नगरपंचायत कर्मचाऱ्यांचे अधिकाऱ्यांचे आभार मानत हिमायतनगर शहरातील त्यांचा कार्यकाळ यशस्वीरित्या व अस्मरणीय गेल्याचे त्यांनी सांगितले त्यानंतर नगरपंचायतीचे कार्यालयीन अधीक्षक महाजन, अभियंता काटकर, श्री मंदिर कमिटीचे उपाध्यक्ष महावीर शेठ श्रीश्रीमाळ, सह विठल ठाकरे यांनी त्यांचे अनुभव सांगून डॉ.उत्कर्ष भगवानराव मोरे यांची नुकतीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेमध्ये अन्न सुरक्षा अधिकारी गट ब या पदावर निवड झाल्यामुळे त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी हिमायतनगर नगर पंचायतचे कार्यालय अधीक्षक चंद्रशेखर महाजन, लेखापाल चींते, अभियंता काटकर, श्री परमेश्वर देवस्थान ट्रस्ट कमिटीचे उपाध्यक्ष महावीर सेठ श्रीमाळ, माजी नगराध्यक्ष अब्दुल अखिल भाई, कुणाल राठोड, अनंता देवकत्ते, संजय माने, विठ्ठल ठाकरे, सरदार खान पठाण, काँग्रेस अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष फेरोज खान पठाण, सह पत्रकार व गावकरी मंडळी व नगर पंचायत चे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.